सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए-०८२५/ प्र.क्र.३१९/विशा-४, दि.०१/१२/२०२५

**विषय** :- संरक्षित व्यक्तींना वर्गिकृत संरक्षण पुरविण्यासाठी उच्चस्तरीय व पुनर्विलोकन समितीची पुनर्रचना करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृहविभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए-०८२५/प्र.क्र.३१९/विशा-४,दि.०१/१२/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२०११७५४१६८२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Sujata Krishna Pankar
Date: 03-12-2025
16:56:52

( सुजाता पानकर )
कार्यासन अधिकारी
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**संरक्षित व्यक्तींना वर्गिकृत संरक्षण पुरविण्यासाठी उच्चस्तरीय व पुनर्विलोकन समितीची पुनर्रचना करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसएसए-०८२५/प्र.क्र.३१९/विशा-४**
मंत्रालय मुख्य इमारत, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
तारीख: ०१ डिसेंबर, २०२५.

**वाचा:-**

१)परिपत्रक क्र.१००७/प्र.क्र.९६/विशा-४, दिनांक १८.०९.२००७

२)शासन निर्णय क्र.एसएसए-१०१०/प्र.क्र.२४५/विशा-४, दिनांक ०५.०२.२०११

३)शासन निर्णय क्र.एसएसए-१११४/प्र.क्र.५४१/विशा-४,दिनांक ०१.१२.२०१४.

४)आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक १८.०६.२०२५ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना :**

राज्यातील महत्त्वाच्या राजकीय व इतर व्यक्तींना असलेल्या संभाव्य धोक्याचा वेळोवेळी आढावा घेऊन त्यांना सुरक्षा वर्गवारी प्रस्तावित करण्यासाठी शासनपत्र गृह विभाग दि.३१.०३.१९८६ अन्वये आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. शासन परिपत्रक दि.१८.०९.२००७ अन्वये सदर समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे.

सदर उच्चस्तरीय समितीने सादर केलेल्या अहवालाचे पुनर्विलोकन करून शासनास शिफारशी करण्यासाठी शासन निर्णय गृह विभाग दि.५.०२.२०११ अन्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्यात आली आहे. शासन निर्णय गृह विभाग दि.०१.१२.२०१४ अन्वये उच्चस्तरीय समितीने सादर केलेल्या वर्गवारी सुरक्षेबाबतच्या अहवालावर या पुनर्विलोकन समितीच्या स्तरावरच अंतिम निर्णय घेण्यात येईल. त्याला शासन मान्यतेची आवश्यकता राहणार नाही,असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

वर्गीकृत संरक्षित व्यक्तिंच्या संरक्षणाबाबतचा आढावा घेण्यासंदर्भातील उच्चस्तरीय समिति तसेच पुनर्विलोकन समिती स्थापन करून बराच कालावधी झाला असून त्यानंतर राज्यातील पोलीस यंत्रणेत काही महत्वाचे बदल झालेले आहेत व काही नवे विभाग व महत्वाची पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. या सर्व बाबी लक्षात घेऊन सध्याच्या उच्चस्तरीय समितीमध्ये तसेच पुनर्विलोकन समितीमध्ये काही अधिकाऱ्यांचा समावेश करुन समितीची पुनर्रचना करण्यात यावी, असा प्रस्ताव आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग यांनी शासनाकडे पाठविला होता. त्या अनुषंगाने वाचा क्र.१ ते ३ येथील नमुद शासन निर्णय अधिक्रमीत करून उच्चस्तरीय समितीची तसेच पुनर्विलोकन समितीची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेता, वर्गीकृत संरक्षण दिलेल्या व्यक्तिंच्या संरक्षणाचा आढावा घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीची पुनर्रचना करुन खालिलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१.आयुक्त, व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई - अध्यक्ष.
२.विशेष पोलीस महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई – सदस्य.
३.सह/उपसंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई – सदस्य.
४.सह पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई – सदस्य.
५.पोलीस सह आयुक्त, गुप्तवार्ता, मुंबई – सदस्य.
६.अपर पोलीस आयुक्त (संरक्षण व सुरक्षा), मुंबई – सदस्य.
७.सह/उप सचिव, गृह विभाग (विशा-४), मंत्रालय, मुंबई – सदस्य.
८.अपर पोलीस आयुक्त, विशेष शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई – सदस्य.
९. विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई– सदस्य सचिव.

वर्गीकृत संरक्षणाबाबत वरीलप्रमाणे नमूद उच्चस्तरीय समितीने सादर केलेल्या अहवालाचे पुनर्विलोकन करून अंतिम निर्णय घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीची पुनर्रचना करुन खालिलप्रमाणे पुनर्विलोकन समिती गठीत करण्यात येत आहे.

(१)मा.मुख्य सचिव - अध्यक्ष
(२)अपर मुख्य सचिव (गृह) – सदस्य.
(३)पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई - सदस्य.
(४)पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई - सदस्य.
(५)आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई - सदस्य.
(६)पोलीस सह आयुक्त, गुप्तवार्ता, मुंबई – सदस्य.
(७)विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई– सदस्य.
(८)अपर पोलीस आयुक्त (संरक्षण व सुरक्षा) – सदस्य.
(९)प्रधान सचिव (विशेष) - सदस्य सचिव.

उच्चस्तरीय समितीने सादर केलेल्या वर्गवारी सुरक्षेबाबतच्या अहवालावर वरीलप्रमाणे गठीत पुनर्विलोकन समितीच्या स्तरावरच अंतिम निर्णय घेण्यात येईल. त्याला शासन मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

सदर पुनर्विलोकन समितीची बैठक दर ३ महिन्यांनी व आवश्यकतेनुसार घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१२०११७५४१६८२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2025.12.01 17:55:16 +05'30'

**(चेतन निकम )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१.मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२.अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
५. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
६. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस सह आयुक्त, गुप्तवार्ता, मुंबई.
८. विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई.
९. अपर पोलीस आयुक्त (संरक्षण व सुरक्षा), मुंबई.